# पी.डब्लू.डी.व्ही.ए.नं. ६६/२०२३ नि. ५ वरिल आदेश

CNR No. MHST07-002951-2023

कल्पना अतुल पवार व इतर वि. अतुल सुभाष पवार व इतर

१. प्रस्तुतचा अर्ज अर्जदार यांनी महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण कायदा कलम २३ प्रमाणे दरम्यानची पोटगी मिळणेकरिता दाखल केलेला आहे.

**अर्जदाराचे अर्जातील कथन थोडक्यात असे की :-**

२. अर्जदाराने असे कथन केले की, अर्जदार व सामनेवाला यांचा विवाह दि. ०१/१२/२०२१ रोजी झाले आहे. सामनेवाला क्र. १ हा सतत शारिरिक व मानसिक छळ करत असत व सतत चारित्र्यावर संशय घेत असत त्यामुळे त्यांचे पहिले बाळाची वाढ झाली नाही व ते बाळ पाचव्याच महिण्यात गेले. तसेच घरातील किरकोळ कारणावरुन सामनेवाला क्र. १ ते ३ हे अर्जदाराचा सतत अपमान करायचे व शिवीगाळ करत होते. तसेच हुंडा न आणल्यामुळे सामनेवाला क्र. २ ही टोचून बोलत होती.

३. अर्जदाराचे पुढे असे कथन केले की, तिला दि. ०४/११/२०२२ रोजी गळा दाबून जिवे मारण्याचा प्रयत्न केला. अर्जदारास घरातून बाहेर हाकलून दिले. तसेच सामनेवाला क्र. १ हे अर्जदारास सोडचिठ्ठी दे अशी धमकी देत होते. त्यामुळे, अर्जदार यांना प्रचंड शारिरिक मानसिक त्रास होत आहे. सदर अर्जाचे कामकाजास बराच उशीर होणार आहे. सबब, अर्जदार हिस दरमहा उदरनिर्वाह भत्ता म्हणून र.रु. २५,०००/-, घर भाडयासाठी दरमहा रुपये १०,०००/- अर्जदार क्र. २ करिता रक्कम रुपये १०,०००/- मिळणेसाठी प्रस्तुतचा अर्ज तिने सदर कायदयाचे कलम २३ प्रमाणे दाखल केला आहे.

४. सदर अर्जाचे कामी सामनेवाला यांचेवर बजावणी होवून, सा.वाला हे सदरकामी हजर झाले. सामनेवाला यांनी नि. ६ वर त्यांचे म्हणणे दाखल केले. सामनेवाला यांनी अर्जदार यांचे अर्जातील कथने नाकारलेली आहे. सामनेवाला याचे असे कथन आहे

की, अर्जदाराने तिचे पहिले लग्न झाले आहे ही बाब सामनेवाला यांच्यापासून लपवून ठेवली होती व सोडचिठ्ठी न देता अर्जदार हिने सामनेवाला क्र. १ ही दुसरे लग्न केले आहे. त्यामुळे प्रस्तुतचा विवाह हा बेकायदेशीर आहे. अर्जदार हिने पहिल्या पतीविरुद्ध फौ.किरकोळ अर्ज क्र. ६७१/२०१५ हा दाखल करुन त्यात पोटगी रक्कम रुपये २५००/– मंजूर करुन घेतली आहे. सदर पोटगी रक्कम जास्त असल्याने पहिल्या पतीने राहते घर मे.कोर्टातून जप्त करुन ते घर विक्री काढले आहे. अशाप्रकारे अर्जदार ही दोन्ही पतींकडून पैसे वसूल करत आहे. त्यामुळे अर्जदाराचा प्रस्तुतचा अर्ज काढून टाकण्यास पात्र आहे. तसेच सामनेवाला यांनी अर्जदार हिचा कधीही शारिरिक अथवा मानसिक छळ केला नाही. त्यामुळे अर्जदार हिचा पोटगीचा अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी विनंती त्यांनी केलेली आहे.

५. उभय पक्षकारांचे कथने विचारात अर्जाच्या निर्णयासाठी खालील वादप्रश्न उपस्थित झाले. त्यासंबंधीचे निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नमुद केलेले आहेत.

| अ.नं. | वादप्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार ही प्रथम दर्शनी सिद्ध करते काय की, सामनेवाला यांनी तिचा कौटुंबिक हिंसाचार केला आहे ? | होय |
| २ | अर्जदार हे सिध्द् करतात काय की सा.वाला यास उत्पन्नाचे साधन आहे ? | होय |
| ३ | अर्जदार हे सिद्ध करतात काय की, तिला उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही ? | होय |
| ४ | अर्जदार ही सा.वालाकडून अर्जात नमुद केल्याप्रमाणे अंतरिम आदेश मिळण्यास पात्र आहे काय? जर होय, तर कोणते आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

| | | |
|---|---|---|
| ५ | कोणता आदेश ? | अर्ज अंशतः मंजूर करणेत येतो. |

## कारणमिमांसा

### वादप्रश्न क्र. १ ते ४ करिता :–

६. सामनेवाला यांच्या विधीज्ञांनी असा युक्तीवाद केला आहे की, अर्जदार हिचे पहिले लग्न राहूल विष्णू राऊत याचे सोबत झाले आहे व ते लग्न अदयापही अस्तित्वात आहे. असे असताना सदर लग्नाची बाब अर्जदाराने सामनेवाला पासून लपवून ठेवून सामनेवाला याच्यासोबत दुसरे बेकायदेशीर लग्न केले आहे. अशा परिस्थितीत अर्जदाराचा प्रस्तुतचा अर्ज चालू शकत नाही. सामनेवाला याच्या विधीज्ञांनी त्यांच्या युक्तीवादाच्या समर्थनार्थ खालील न्यायनिवाडयांवर भिस्त ठेवली आहे.

1. Satendra Kumar Sharma Vs. Uma Satendra Kumar Sharma, 2018 Cri. L.J. 4223 ( Honorable Rajasthan High Court )

2. Ajay Kumar Reddy Vs. State of Chhattisgarh, 2018 Cri.L.J. 1155 (Honorable Chattisgarh High Court)

3. Reshma Begam Gajanfar Kazi Vs. State of Maharashtra, Criminal Revision App. No. 82/2017, decided on 25/07/2018 (Honorable Bombay High Court)

७. वरिल सर्व न्यायनिवाडयामध्ये मा. उच्च न्यायालयाने असे नमुद केले आहे की, पहिले लग्न अस्तित्वात असताना दुसरे लग्न केले तर ते कायदेशीर ठरत नाही व त्यामुळे कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा कलम २००५ या कायदयाच्या तरतुदीप्रमाणे अर्जदार यांनी केलेला अर्ज कायदेशीर ठरत नाही व तो रद्द करण्यास पात्र आहे.

८. याउलट, अर्जदार यांच्या विधीज्ञांनी असा युक्तीवाद केला की, अर्जदार हिने तिचे प्रथम पतीपासून त्यांच्या जाती रिवाजाप्रमाणे घटस्फोट घेतला आहे. सदरची बाब अर्जदार हिने सामनेवाला यांस लग्नापूर्वी सांगितली होती व त्यानंतर सामनेवाला याच्या सहमतीने त्यांचे लग्न झाले आहे. अर्जदार हिने सामनेवाला पासून पहिल्या लग्नाची बाब लपवून ठेवलेली नाही. तसेच अर्जदार हिने पहिल्या पतीपासून जाती रिजवाजाप्रमाणे घटस्फोट घेतला असल्यामुळे तिचे सामनेवाला सोबतचे लग्न बेकायदेशीर होत नाही. त्यामुळे अर्जदार हिने दाखल केलेला अर्ज कायदेशीर असून तो मंजूर होण्यास पात्र आहे.

९. अर्जदार हिने तिचे कथनाचे पृष्ठार्थ नि. १८ वर शपथपत्र दाखल करुन तिचा व तिचा प्रथम पती राहूल विष्णू राऊत यांच्यामध्ये जातीतील रिवाजाप्रमाणे घटस्फोट झाला असल्याचे व त्यामुळे तिचा प्रथम विवाहसंबंध संपुष्ठात आला असल्याचे कथन केले आहे. याउलट सामनेवाला याने नि. १९ वर शपथपत्र दाखल करुन अर्जदार याने तिला प्रथम लग्नाची माहिती दिली नव्हती व अर्जदार हिचा प्रथम विवाह जातीरिवाजाप्रमाणे घटस्फोट घेवून संपुष्ठात आला नसल्याबाबत कथन केले आहे.

१०. अर्जदार व सामनेवाला हे धर्माने हिंदु आहेत तसेच अर्जदार व तिचे प्रथम पती हे देखील धर्माने हिंदु आहेत याबाबत विवाद नाही. हिंदु विवाह कायदा कलम २९(२) प्रमाणे जातीतील रितीरिवाजाप्रमाणे घटस्फोट घेण्याची तरतुद आहे. अर्जदाराच्या कथनाप्रमाणे तिने त्यांच्या जातीतील रितीरिवाजाप्रमाणे तिचे प्रथम पतीपाासून दि. १५/०६/२०१७ रोजी घटस्फोट घेतलेला आहे. सदरचा घटस्फोट कायदेशीर आहे किंवा बेकायदेशीर हे ठरविण्याचे न्यायअधिकार क्षेत्र या न्यायालयास नाही. सदरचे अधिकारक्षेत्र हे मा. जिल्हा न्यायालय अथवा मा. दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर यांना हिंदु विवाह कायदयाच्या तरतुदीप्रमाणे आहे. तिचा प्रथम विवाह त्यांच्या जातीतील

रितीरिवाजाप्रमाणे दि. १५/०६/२०१७ रोजी संपुष्ठात आला आहे व त्याची माहिती तिने सामनेवाला यांस दिलेली आहे. तसेच सामनेवाला याने त्यांचे खुलाश्यातील परिच्छेद क्र. ४, ६ व ७ मध्ये त्याचे व अर्जदार यांचे लग्न दि. ०१/१२/२०२१ रोजी हिंदु धर्मशास्त्राप्रमाणे मान्य व कबूल केले आहे. त्यामुळे सद्यस्थितीत प्रथमदर्शनी हे सिद्ध होते की, अर्जदार हिचे सामनेवाला सोबत लग्न झाले त्यावेळी तिचे प्रथम लग्न संबंध संपुष्ठात आले होते व अर्जदार व सामनेवाला यांचे झालेले लग्न हे कायदेशीर असून त्यांचे लग्न संबंध अदयाप कायम आहेत. तसेच सदर लग्न संबंधातून त्यांना दि. ०३/०५/२०२३ रोजी मुलगी झालेली आहे हे देखील सामनेवाला याने मान्य केले आहे. त्यामुळे प्रस्तुत अर्ज हा कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण या कायदयातील तरतुदीप्रमाणे कायदेशीर आहे. सबब, सामनेवाला यांच्या विधीज्ञांनी भिस्त ठेवलेले उपरोक्त **न्यायनिवाडयातील न्यायतथ्ये** प्रस्तुत अर्जास लागू होत नाहीत.

११. अर्जदार हिने शपथेवर असे कथन केले आहे की, अर्जदाराने शपथेवर हे कथन केले आहे की, सामनेवाला क्र. १ हा सतत शारिरिक व मानसिक छळ करत असत व सतत चारित्र्यावर संशय घेत असत त्यामुळे त्यांचे पहिले बाळाची वाढ झाली नाही व ते बाळ पाचव्याच महिण्यात गेले. तसेच घरातील किरकोळ कारणावरुन सामनेवाला क्र. १ ते ३ हे अर्जदाराचा सतत अपमान करायचे व शिवीगाळ करत होते. तसेच हुंडा न आणल्यामुळे सामनेवाला क्र. २ ही टोचून बोलत होती. अर्जदाराचे पुढे असे कथन केले की, तिला दि. ०४/११/२०२२ रोजी गळा दाबून जिवे मारण्याचा प्रयत्न केला. अर्जदारास घरातून बाहेर हाकलून दिले. तसेच सामनेवाला क्र. १ हे अर्जदारास सोडचिट्ठी दे अशी धमकी देत होते. त्यामुळे, अर्जदार यांना प्रचंड शारिरिक मानसिक त्रास होत आहे.

१२. सामनेवाला याने दाखल केलेल्या खुलाश्यावरुन त्याने त्याचे व अर्जदार हिचे लग्न बेकायदेशीर असल्याचे कथन केले आहे. सदरची बाब देखील एकप्रकारे कौटुंबिक हिंसाचार या प्रकारात येते.

१३. तसेच अर्जदार व सामनेवाला यांचे कथनावरुन, हे स्पष्ट होते की, अर्जदार ही दि. ०४/११/२०२२ रोजी पासून, तिच्या माहेरी राहत आहे. अर्जदार माहेरी राहण्याचे कारण उभय पक्षकारांनी वेगवेगळे नमुद केले आहे. असे असले तरी, अर्जदार ही कोणत्याही ठोस कारणाशिवाय तिचे सासरचा त्याग करुन माहेरी जाईल हे पटत नाही. तसेच, उभय पक्षकारांच्या कथनावरुन व अभिलेखावरिल कागदपत्रांवरुन, प्रथमदर्शनी हे स्पष्ट होते की, अर्जदार हिस सद्यस्थितीत उत्पनाचे कोणतेही साधन नाही. अर्जदार ही माहेरी राहत असल्यापासून सामनेवाला क्र. १ याने तिच्या उदरनिर्वाहासाठी कोणतीही तरतूद केलेली दिसून येत नाही. सदरची बाब ही आर्थिक हिंसाचार या प्रकारात मोडते. सबब, प्रथमदर्शनी हे सिद्ध होते की, सामनेवाला यांनी अर्जदार हिचा कौटुंबिक हिंसाचार केला आहे.

१४. सामनेवाला यांनी असे नमुद केले आहे की, अर्जदार ही उच्च शिक्षीत आहे व ती स्वतःचा उदरनिर्वाह करण्यास समर्थ आहे. परंतु, सदरची बाब सिद्ध करण्यासाठी सामनेवाला यांनी कोणताही तोंडी अथवा कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. सबब, अर्जदार ही तिचे उदरनिर्वाह करु शकते ही बाब प्रथमदर्शनी सिद्ध होत नाही.

१५. सामनेवाला याने तो नोकरी करत असून त्यास दरमहा रक्कम रुपये ९,०००/– पगार मिळत असल्याचे मान्य केले आहे. तसेच सामनेवाला याचे वयावरुन त्याची शारिरिक कष्टाची कामे करण्याची क्षमता असल्याचे दिसून येते. त्यामुळे तो

शारिरिक कष्टाची कामे करुन दरमहा रक्कम रुपये १५ ते १८ हजार निश्चीतपणे कमवू शकतो.

१६. अर्जदार हिने दरमहा उदरनिर्वाह भत्ता म्हणून र.रु. २५,०००/–, घर भाडयासाठी दरमहा रुपये १०,०००/–, अर्जदार क्र. २ करिता रक्कम रुपये १०,०००/– मिळणेसाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. परंतु तिला दरमहा वरिलप्रमाणे खर्च येत आहे हे दर्शविणारा कोणताही पुरावा अर्जदार हिने दाखल केलेला नाही. सबब अर्जदार हिचा दरमहाचा खर्च व सामनेवाला याचे दरमहाचे उत्पन्न याचा विचार करता सामनेवाला क्र. १ याने अर्जदार हिस प्रस्तुत अर्ज दाखल केल्यापासून दरमहा रक्कम रुपये २,५००/– उदरनिर्वाहासाठी, रक्कम रुपये २,०००/– घर खर्चासाठी, रक्कम रुपये १,०००/– अर्जदार क्र. २ हिचे उदरनिर्वाहासाठी व दरमहा रक्कम रुपये ५००/– न्यायालयीन खर्चासाठी अदा करण्याबाबत आदेश करणे न्यायोचित वाटते.

१७. अर्जदार हिने सामनेवाला यांच्या पासून कौटुंबिक संरक्षण मिळण्याची देखील विनंती केली आहे. परंतु तिने हे मान्य केले आहे की, ती सध्या तिच्या आईकडे राहत आहे. तसेच ती आईकडे राहत असल्यापासून सामनेवाला यांनी तिचा कौटुंबिक हिंसाचार केला आहे किंवा कसे याबाबत तिने काहीएक नमुद केलेले नाही. सबब कौटुंबिक संरक्षणाचा आदेश सामनेवाला विरुद्ध पारित करणे योग्य होणार नाही. वरिल विवेचनावरुन मी खालील प्रमाणे आदेश पारित करत आहे.

**<u>आ दे श</u>**

१. अर्जदार हिचा अर्ज अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२. सामनेवाला क्र. १ याने अर्जदार हिस प्रस्तुत अर्ज दाखल केल्यापासून दरमहा रक्कम रुपये २,५००/– उदरनिर्वाहासाठी, दरमहा रक्कम रुपये

२,०००/– घर खर्चासाठी, दरमहा रक्कम रुपये १,०००/– अर्जदार क्र. २ हिचे उदरनिर्वाहासाठी व दरमहा रक्कम रुपये ५००/– न्यायालयीन खर्चासाठी अदा करावे.

३. अर्जदार हिच्या इतर अंतरिम मागण्या नाकारण्यात येत आहेत.

४. प्रस्तुत अर्जाची प्रत उभय पक्षकारांना मोफत देण्यात यावी.

स्थळ : कराड ( एम.व्ही.भागवत )

दिनांक : ०४/०३/२०२४ ५ वे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कराड.